DEOGIRI COLLEGE Seal CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

म. शि. प्र. मंडळ संचालित

# देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

दि. ०५ / १० /२०२६

## सूचना

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सहसंचालक उच्च शिक्षण यांचे पत्र जा.क्र. विसहसं/उशि/छत्रसंवि/स्वायत्त महा./२०२६-२७/ दिनांक : ०१/१०/२०२६ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पत्र क्र. संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२६-२७/८९७ दिनांक : ०१/१०/२०२६ संदर्भीय पत्रानुसार शासन निर्णय दिनांक २५/०९/२०२६ मध्ये घोषित दुष्काळग्रस्त तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत योजना लागू केली आहे.

सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी शासन निर्णय यादीतील घोषित दुष्काळसदृश्य तालुक्यातील पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील हमीपत्र दि. १३ / १० / २०२६ पर्यंत भरुन देणे अनिवार्य आहे. हमीपत्राशिवाय परीक्षा शुल्क माफी योजनेच्या सवलतीचा लाभ विद्यार्थ्यांना घेता येणार नाही. सदरील योजनेचे पात्रता निकष पुढीलप्रमाणे आहेत.

**पात्रता निकष :**

महाराष्ट्र शासनाकडून घोषित यादीतील दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थी हा रहिवाशी असावा व संबंधित विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लक्ष मर्यादेपर्यंत असावे.

हे निकष पूर्ण करणारे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत.

* **ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही.**

१. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या इतर कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क सवलत उदा. महाडीबीटी मार्फत मिळणारी शिष्यवृत्ती किंवा तत्सम योजनांचा लाभ घेणारे विद्यार्थी

२. जे विद्यार्थी त्याच परीक्षेत दुसऱ्यांदा बसले असतील. (रिपीटर)

३. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहातात, नोकरी धंदा करतात, परंतु त्यांचे नांवे गावी शेतजमीन आहे असे विद्यार्थी

वरील प्रकारातील विद्यार्थी सदरील योजनेसाठी पात्र असणार नाहीत.

तरी सर्व विद्यार्थ्यांनी याची नोंद घेवून परीक्षा विभागाने दिलेल्या कालमर्यादेत परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरावेत.

प्राचार्य

प्राचार्य
देवगिरी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

सोबत : हमीपत्र विहीत नमुना

G:/Notice/Oct-2026/4